म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४७०

REFBK-0022879
REFBK-0022879

किशोर पाठक

२४९७
२२८७९
२४१५/८०

# पालव

कविता
संग्रह

काव्य

REFBK-0022879

REFBK-0022879

# पालव

किशोर
पाठक

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

प्रकाशक : रत्नाकर अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०
मुद्रक : शशिकान्त महादेव देव,
सुलभ मुद्रणालय, शनिवार पेठ, पुणे ३०
मुखपृष्ठ : किशोर पेंढरकर
प्रकाशन क्रमांक : ८४६
प्रथमावृत्ती : १९७९
सर्व हक्क सुरक्षित
किंमत पाच रुपये

ती. कै. बाबांना

तात्यासाहेब शिरवाडकरांचा अखंड पितृतुल्य आशीर्वाद
आणि अनंतराव कुलकर्णींची चोखंदळ वडीलकी,
— दोघांमधून पहिला शब्द ' पालव 'ला.
अनिरुद्ध आणि ' सुलभ 'च्या बापूसाहेब देवांनी
कवितांना काटेकोर ' बांधलं '.
अरुणानं त्याला नाव दिलं.
किशोर पेंढरकरांनी चेहरा रंगविला.
रा. ग. जाधवांनी ' घर ' उघडून कवितांची रसिकतेने पारख केली
विनायकराव पाटील, म. सु. पाटील, बाळासाहेब सराफ,
विजय हरी वाडेकर आणि ' सुहृद '—
सर्वांनी संग्रहाची पाठराखण केली.
मी सदैव सर्वांच्या ऋणात.

किशोर पाठक

## समयांची घरे

निसर्गाच्या चैतन्यशक्तीचा आविष्कार म्हणजे पालवी! वसंतऋतून पाना-फुलांनी डवरून येणाऱ्या वृक्षवेली त्या चैतन्यशक्तीचाच प्रत्यय देत असतात, घेत असतात. त्या वृक्षवेलींचे हृद्गत कुणी जाणले आहे?

—पण एखादे तरल संवेदनशील मन रंग आणि अंतरंग यांचे आकृतिबंध आतल्या उमाळ्याने बांधू लागते, तेव्हा ते हृद्गत समजल्यासारखे वाटू लागते. किशोर पाठक यांची कविता वाचताना हाच अनुभव येतो. फुलण्याचे, पल्लवित होण्याचे भान जपत जपत आपल्या अस्तित्वाचा एक समग्र आविष्कार आपल्या सकल शक्तींनिशी साधण्याचा प्रयोग म्हणजे पालव! पाठकांची कविता, खरे तर, या अर्थानेच 'पालव' असल्याचे जाणवते. पण एवढेच नाही; 'पालव' या काहीशा सांकेतिक नि रोमँटिक प्रतिमेतून ही किशोर-कविता कळत नकळत स्वतःची सुटका करून घेण्याचा नि स्वतंत्रता ठसविण्याचा प्रयत्न करताना दिसते. 'पालव' हा कवीचा आपल्या कवितेसंबंधीचा कदाचित अभिमाय असेल, कदाचित प्रत्ययही असेल; पण त्याची कविता मात्र पालवाच्या सांकेतिकतेत थांबलेली नाही; थांबणारही नाही.

—याचे कारण आहे...!

स्वतःचे रंग नि अंतरंग आपल्या खास सत्त्वासह रूपास आणणारी काही स्थळे या 'किशोर'कवीने गाठलेली आहेत. 'अक्षर' या कवितेत रात्रीच्या ओलसर बोचऱ्या अंधारात दूर कुठे तरी झुलणारे झांज– मृदंगाचे सूर ऐकत असताना या कवीचा जन्म झाला, एका अनावर यदृच्छेने!

—" ओठांमधून चटकन् ढळले एक चटोर अक्षर फक्त सारा जन्मच ढवळून गेला आणि थरकला जलाशय संथ." सुरांच्या साथीत झालेला कवित्वाचा हा साक्षात्कार सुरांशी एक कायमचे नाते बांधून जातो. हे जन्मसिद्ध नाते जन्मभर निभावण्याचे आव्हान या कवीपुढे आहे. मुक्तच्छंदाचे रूढ घाट या संग्रहात खूप आढळतात आणि गझलसारखे आकृतिबंधही दिसून येतात. या दोहोतून वाट काढून अनुभूतीची लय नि स्वरांचे बंध यांची सुसंगत सांगड घालून आपली स्वतंत्र अभिव्यक्ती साधणे, या कवीला अवघड नाही. या कवीला गायचे आहे, वाचायचे नाही असे मला वाटते. आणि हे त्यालाही वाटत असावे...

या कवीच्या " उजाड छातीवर कवितांचे व्रण आहेत, जागोजाग नि रातोरात!" आणि असे व्रण करून जाणारी ती कविता कुठे आहे, याचा कवी शोध घेत आहे. [ " तुझी ती कुठेय ? ] कवित्वाचे हे सतीचे वाण! नासिकच्या गोदाकाठच्या परिसरात कवित्वाचे असलेच वाण निपजतात, त्याला किशोर पाठक तरी काय करणार ? कवी गोविंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, क्रांतीचा जयजयकार करणारे कुसुमाग्रज यांच्या परिसरात कविता जन्मावी ती अंतरीच्या जखमांतून, अशीच नियती आहे. त्या कवींच्या रेषेत जन्माने रेखाटलेला हा कवी म्हणूनच काव्याशी जीवनाने असलेले नातेही अटळपणे स्वीकारतो.

पण हे नाते आहे जीवनातील अथांग रितेपणाशी, पोकळीशी! या रितेपणाच्या आभाळाचे विराट प्रतिबिंब आपल्यात उमटवून घेणारा समुद्र म्हणजे कवी! नव्या पिढीचे हे जीवितनाते शून्यतेचे द्योतक असले, तरी ते नाते अबाधित आहे; त्याचा नकारात्मक आशय म्हणजे नात्याचा नकार नाही; केवळ अर्थाचा नकार आहे, एवढेच! या दृष्टीने ' दुःख ' या कवितेतील आशय दुःखाची एक जुनीच समज नव्या प्रतिमेतून–आभाळ-समुद्र यांच्या प्रतिमेतून–व्यक्त करते. एका कंगाल बधिरलेल्या मित्राच्या भेटीतील वि-संवाद या कवितेतील शब्दचित्रात उभा करून कवी म्हणतो :

" त्याचे नागवे डोळे आभाळ बनले
आणि क्षणात मी समुद्र झालो. "

स्वच्छंदतावादातील आभाळ नि समुद्राच्या प्रतिमा इथे एका अस्तित्ववादी

रितेपणाचा नवा पवित्रा घेऊन अवतरलेल्या दिसतात. चैतन्यदायी रोमँटिक पालवीला इथे चैतन्यहीन नवरोमँटिक कळा प्राप्त होते.

आभाळ, समुद्र, पाऊस, नदी यांच्या वास्तवाशी अंतरंगाचे नाना पाश गुंतवीत किशोर त्यांचा नि स्वतःचा शोध घेत आहेत. किशोरवयीन मनाला चेतवून जाणाऱ्या या नेहमीच्याच निसर्गरूपांना कवीच्या भावविश्वात एक प्रभावी स्थान लाभले आहे.

" मला रस्त्यात समुद्र भेटला
घे हा ढग...म्हणून पसार झाला "

— हा ढग गडगडणारा, बरसणारा, कवित्वाने जगणारा नि सगळ्यांचे जीवन पिकविणारा ! कवित्वाचा आत्मप्रत्यय किशोर या रीतीने व्यक्त करू लागला, की ' पालवी 'च्या नैसर्गिक पार्श्वभूमीचे मर्म स्पष्ट होत जाते.

आभाळ हे तर या कवितांना अंतर्बाह्य वेढून, झपाटून राहिले आहे.

" आता पडतो रस्त्यारस्त्यावर
लालजर्द गुलमोहराचा सडा
.......आभाळाएवढा । " [ ' सडा ' ]

* * *

" डोळे गच्च मिटले की
आभाळही डोळ्यात दाटून येतं म्हणे । " [ ' चांदण्या ' ]

" माझ्या थकल्या पायांखाली
आभाळाची प्रचंड पोकळी झुलत असते." [ ' मी ' ]

— नदी हे प्रीतीचे संकेतस्थळ खरे; पण या कवीने ज्या नदीच्या कविता लिहिलेल्या आहेत, त्यात प्रीतीची व्यस्त अनुभूती व्यक्त झालेली आहे.

या पालवीच्या पायाखाली जसे आभाळ झुलत आहे, तसेच ते तिच्या माथ्यावरही डुलत आहे. ' पाऊस : काही सर्ग आणि विसर्ग ' या २१ कवितांच्या विभागात पाऊस हा कधी प्रतीक, तर कधी प्रतिमा, कधी वस्तुस्थिती, तर कधी फँटसी, कधी आशय, तर कधी पार्श्वभूमी या नाना रूपांनी व्यक्त झाला आहे.

या कवीला पावसाने जणू भारून टाकले आहे, असेच जाणवत राहते. कवीच्या कल्पकतेला पावसाने जणू पालवी फुटलेली आहे. त्याची संवेदनशीलता पावसाच्या प्रतिमेतून बहरते नि अचपळ तरल अशा कल्पनाचित्रांच्या, भावचित्रांच्या रूपाने प्रकट होत जाते. सलगपणे वाचताना या पावसाच्या कविता क्वचित कंटाळवाण्या वाटू लागतात; कारण 'पाऊस' हे कवीच्या कोणत्याही भावःस्थितीचे व कल्पनेचे एक हुकमी चिन्ह म्हणून यांत्रिकपणे वापरले जात आहे की काय, याची शंका येऊन जाते. तथापि

"पावसाच्या स्वप्नांना पावसाचे दार
काजळकोवळया काळिजात पावसाचे बिंब
नात्यांचे.... पात्यांचे... पाऊसगर्भ टिंब !"

यासारख्या सुंदर अर्थगर्भ रचना या विभागात आहेतच. 'पाऊस' ही कवीच्या समग्र अस्तित्वाची भावपूर्ण अभिव्यक्ती ठरते. पावसाने त्याची कल्पनाशक्ती झपाटते, भावनांना उधाण येते नि त्यातून नाना जाणिवांच्या सतेज प्रतिमा साकारतात.

समग्र अस्तित्वाची अभिव्यक्ती ! किशोर पाठक यांचे कविमन व्यस्त नि अस्ताव्यस्त होते, ते या समग्रतेला गवसणी घालण्यासाठी ! ऐन पंचविशीतला हा तरुण इंजिनिअर ! शिक्षण नि व्यवसाय इमारती उभारण्याचा ! पण तो सत्त्व, स्वत्व नि साफल्य शोधतो आहे, कवितेच्या क्षेत्री ! युवामनाचा स्वाभाविक धर्म म्हणजे जे काही बघायचे, जपायचे, संपादायचे ते सर्वस्व पणाला लावून ! हे सर्वस्व पणाला लावून जगायचे भान किशोरकवीच्या सगळयाच कवितांना लपेटून आलेले आहे. जे पाह्यचे तेही समग्रपणे, जे व्यक्त करायचे तेही समग्रपणे ! या समग्र अस्तित्वाच्या ज़ाणीवेचे रूप मग पावसासारख्या कवितांतून परोपरीने व्यक्त होते. आणि गझलांतूनही ! पण या ध्यासातून पुष्कळदा कविता सपक संकीर्ण रूप धारण करते. जे रूढ ट्रेण्ड्स् आहेत तेच स्वीकारू लागते, व विकीर्ण विसविशीत होऊन विघटित होते. अनुकरणाचे रंग दावू लागते. आणि स्वतःचा चेहरा हरवून बसते. हे टाळले पाहिजे. तथापि,

पाखरे हिरवी उडाली सोडुनी घरटी नभी
गर्द जांभळ आंबराई पाय पसरोनी उभी"

हे गझल समग्रतेचे कवीचे वेड कवितेला कसे अचपळ अफाट रूप देऊन जाते, हे दाखवून जाते. ही हिरवी पाखरे मग किती तरी गोष्टींची प्रतीके बनतात, भावनेच्या एका अनावर वेगात! हिरवी पाखरे नि पाय पसरून उभी राहिलेली आंबराई, हिरवी पाखरे नि माना टाकलेले पान, हिरवी पाखरे नि डंख सोसणारी पापणी, हिरवी पाखरे नि पोरके पाय, हिरवी पाखरे नि हात झडलेली क्षणांची सखी अशी किती तरी नाती एका भावोत्कट व्यथेचा निःश्वास टाकताना या गझलात एकत्र येतात. तरुणमनाची ही अचपळ झेप, अफाट आविष्काराची अनावर ऊर्मी आणि एखाद्या प्रतिमेतून वा प्रतीकातून पहिल्यांदा होणारा एक साक्षात्कार अनेकत्वात विस्तारून देण्याचा, शोधण्याचा दुर्दम्य छंद हिरव्या पाखरांच्या प्रतिमेतून प्रत्ययास येतो. 'सः ऐच्छत् बहुस्याम् ।' हा परब्रह्माचा आविष्कारधर्म! समग्र होणे, सकल होणे, सगळे व सर्व बनणे हा प्रतिभेचा– युवा-प्रतिभेचा–धर्म! किशोर या धर्माचा कवी आहे. शब्द, शब्दकळा, प्रतिमा या सर्वांना एका गतिमान वातचक्रात भिरकावून देण्याचे कवीचे व्रत या कवितांना व्रतस्थ हेतुगंभीर काव्यप्रयोजन लाभवून देते.

या व्रतस्थ हेतुगांभीर्याचे अधिष्ठान एक चिकित्सक आत्मशोधन हे आहे : मी कोण आहे, हाच कवीचा खरा नि अवघड प्रश्न आहे :

"मी उभा अव्यक्त येथे गाव माझा शोधतो
जो कधी जगलाच ना तो जीव माझा शोधतो"

आत्मशोध काय किंवा आत्मसाक्षात्कार काय, त्यांची अभिव्यक्तीची तऱ्हा उफराटी असते. जो कधी जगलाच नाही, तो जीव मी शोधतो! हा कवीचा आयुष्यभरचा उफराटा शोध आहे.

"भोवती माझी चिता पण मी असा वेडा खुळा की
झोपलेल्या त्या शवाला मी पुन्हा निजवीत गेलो"

स्वतःच्या प्रेतवत् जिण्याचे, अस्तित्वाचे हे बधिरीकरण अशा विरोधाभासी वर्णनाचे रूप घेते. हेही आत्मशोधनाचेच तीव्रोत्कट उफराटे रूप आहे.

गझलांच्या या आशयामुळे किशोर पाठकांच्या गझलांना एक खास वेगळेपण लाभले आहे. त्यातील जाणीवांना आत्मपर कणखरपणा व कडवटपणा आहे,

पण आत्मप्रौढी नाही, अहंकार नाही. सामाजिकाची त्यात अहंवादी रेवडी उडविलेली नाही, म्हणून त्यात ऱ्हेटरिक नाही, अलंकारिक, वक्रोक्तिपूर्ण उथळ झळाळी नाही. या गझलांचाही रंग वेगळा आहे. त्यातून,

"अर्थ द्या जगण्यास सच्चा तीच क्रांतीची दिशा
रे कशाला कृष्णकृत्यांची हवी पारायणे ॥"

वर्तमानकालीन संस्कृतिटीका अशा नेमस्तपणाने कवी व्यक्त करतो आणि

"ह्या अंध डोळसांचे मी दीर्घ श्वास झालो
आनंदयात्रिकांना मी पायचीत केले"

यांसारख्या ओळींतून जीर्णशीर्ण रूढीची, पढिक पांडित्याची, संकुचित व क्षुद्र परंपरेची हद्दपारी करताना तसाच नेमस्तपणा तो दाखवितो.

स्वतःसाठी गाणारा हा कवी! "आज मी गाईन गाणी । जी कुणासाठी नसावी ॥" असे म्हणतो. स्वतःसाठी गाणारा कवीच दुसऱ्यासाठी गाणारा ठरतो. गाणे हे गाणाऱ्याचे नसेल, तर ऐकणाराचेही उरत नाही. ही उच्च आत्मनिष्ठाच कवीची गाणी जनाची गाणी बनविते. ही उच्च आत्मनिष्ठा जपतच हा कवी त्याच्या मंझिलापर्यंत पोहोचू शकेल. हे मंझिल कुठे आहे ? कवीजवळ याचे उत्तर आहे : ते मंझिल, "या गावाच्या वेशीबाहेर जिथे समयांची घरे आहेत" तेथे आहे. समयांची घरे एक अप्रतिम अर्थपूर्ण प्रतिमा! तिच्यात परंपरेने पवित्र केलेले जिविताच्या श्रेयसाचे मंगल संकेत दडलेले आहेत. देव, देवपूजा, मनाची एकाग्रता, पावित्र्य, अंतर्बाह्य शांती, जडतेला जिंकणारी आत्मिक कृतार्थता! पालवीची ही पालखी त्या समयांच्या गावी निघाली आहे...... आम्ही सारे त्या दिंडीत आहोतच!

विश्वकोश, वाई — प्रा. रा. ग. जाधव
२० ऑगस्ट १९७९

# अनुक्रमणिका


१. पावलं .... .... .... १
२. अक्षर .... .... .... १
३. अर्थ .... .... .... २
४. सांज .... .... .... ३
५. समुद्र .... .... .... ४
६. समई .... .... .... ५
७. थेंब .... .... .... ६
८. तुझी ती कुठेय ? .... .... ८
९. रस्ते .... .... .... १०
१०. दुःख .... .... .... ११
११. मनाच्या .... .... .... १२
१२. फुंकर .... .... .... १२
१३. मी .... .... .... १३
१४. भेट .... .... .... १३
१५. तोही .... .... .... १४
१६. होवो .... .... .... १४
१७. सजण .... .... .... १५
१८. प्रवास .... .... .... १५
१९. तिरीप .... .... .... १६

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०. | मायबापहो | .... | .... | १७ |
| २१. | चांदण्या .... | .... | .... | १७ |
| २२. | रंग .... | .... | .... | १८ |
| २३. | स्मित .... | .... | .... | १८ |
| २४. | सडा .... | .... | .... | १९ |
| २५. | नियम .... | .... | .... | १९ |
| २६. | डोळ्यात .... | .... | .... | २० |
| २७. | हॅलो कोणी | .... | .... | २० |
| २८. | अंगठा .... | .... | .... | २२ |
| २९. | हुंकार .... | .... | .... | २२ |
| ३०. | नदीच्या कविता | .... | .... | २३ |
| ३१. | सप्तक .... | .... | .... | २४ |
| ३२. | गोष्ट .... | .... | .... | २५ |
| ३३. | आपण कसे | .... | .... | ३० |
| ३४. | जागी .... | .... | .... | ३२ |
| ३५. | तीळ .... | .... | .... | ३३ |
| ३६. | आयुष्य टेकण्यासाठी | | .... | ३४ |
| ३७. | ॥ पाऊस ॥ काही सर्ग ॥ काही विसर्ग | | | ३९ |
| ३८. | काही गजला | .... | .... | ४७ |

## १ पावलं

तो कविता करायचा
त्याच्या शब्दुलीत ती स्वतःलाच निरखीत रहायची
कधी हसायची खुदकन्
......वेलांटीवरून घसरताना
मग तिने त्याचे शब्द ओळीत मांडले
आणि एक एक काळे मणी आजूबाजूने रचले
ओल्या वाळूतून चालणारी जुळी पावलं जशी !
......आणि तिला कळले
        पावलं रुतणे कठीण
पुळणीवरल्या लाटा मात्र भरधाव
......त्याच्या कवितेसारख्या !

## २ अक्षर

चहूंकडून रात्रीचा घनगर्द अंधार ओलसर बोचरा
पाठीवर अंधुक कळ भिनवून जाणारा अवखळ वारा
निवान्त पांढऱ्या सीमित झोतात सारं अवकाश बंदिस्त नीरव
कुठं चुकार पक्ष्यासोबत कुणा चिमणीचा मंजुळ पदरव
दूर कुठे झुलतो सूर लगडून ओला अंधार पीत
झांजेमधून झिरपून जाते पागोळ्यांचे अलवार गीत
ओठांमधून चटकन् ढळले एक चटोर अक्षर फक्त
सारा जन्मच ढवळून गेला आणि थरकला जलाशय संथ.

## ३ अर्थ

तरी रोज सकाळी जेव्हा ती दार उघडीत असे
अगदी प्रथम ......प्रदीर्घ निद्रेनंतर
तेव्हा सगळी सूर्यकिरणे सहीसलामत आत येत
तिच्या लख्ख भांड्यांवर ते चकाकताना
ती आपला नितळ देह
उन्हाने गोंदवून घेत असे
आणि गरम्म त्वचेवर प्राजक्ताचे गजरे बांधीत असे
मात्र पक्ष्यांना दाणे घालताना त्यांचे पंख
चाचपून पाहण्याचा अनावर हट्ट तिने कधी केला नाही.

पण एके दिवशी
प्रतिबिंब न्याहाळताना
झरोक्यातून अगांतुक घुसलेला एक अवजड किरण
तिच्याकडेच सरकत असल्याचे जाणवले
आणि गर्भवती असण्याची पहिली खूण
तिच्या उभार अंगातून ठसठसत गेली.
सूर्याचे उन्मादक श्वास भोगताना
प्राजक्ताच्या झाडाखाली तिने शिंपणसोहळा केला
आणि सारे व्यवस्थित झाले......
अलीकडे तिला विसरच पडला होता रात्रींचा
तिने कधी तरी पाहिले झाडांना आपापसात कुजबुजताना
तरी तिच्या काळजाला कभिन्न काळोखाची
एक विलक्षण चीर पडली
आणि त्यातून आसन्नमरण अंधार ठिबकत राहिला
सध्या ती अधूनमधून दारेखिडक्या उघडते

कुणाकुणास बोलावते
आणि दुपारींचे
        रात्रींचे
        अर्थ विचारीत बसते.

## ४ सांज

सांज गारठली जळी
पडे श्रावणाची थंडी
ओल्या खट्याळ मुलींना
झाली नदीवर बंदी
        कशी एकलीच न्हाऊ
        जळ अंग अंग पिते
        कुणी नाही आसपास
        मन उगाचच भिते
हले पाण्यात सावली
थरकली माझी काया
भिरभिरताती डोळे
कुणी आलं का पहाया
        गळा पडले ते हात
        किती दचकले बाई
        रूप पाहता लाजता
        वारा पदरात येई
........पोर भिजली बुडाली
गेली काव्यांनी सजून
माय घरी दारी म्हणे
लेक येईना अजून.

## ५ समुद्र

मला रस्त्यात समुद्र भेटला.
घे हा ढग......म्हणून पसार झाला.
ऑफिसात येताच सारेजण हसू लागले
तो बघ पाऊस आला......म्हणून हिणवू लागले
तसा मी चिडलो
पाय आपटीत रस्त्यावर आलो
माझ्या पावलापावलावर चिखल झालेला.
दुसऱ्या दिवशी ऑफिसात गेलो
प्रत्येकाला थोडाथोडासा पाऊस
सँपल म्हणून खिशातून वाटला
सर्वांनी तो पोटभर हुंगला......
तसा एकजण म्हणाला
ह्या तर निव्वळ पागोळ्या पावसानंतरच्या !
मी पटकन् उसळलो
तसे ते हात पिटत म्हणाले, लाट आली लाट !
आता मात्र मी खवळलो
ते म्हणाले, समुद्र रे समुद्र !
शेवटल्या दिवशी ते माझ्याकडे आले
आवरणं काढून म्हणाले,
मंथ एंड आहे, थोडासा पाऊस देतोस ?
मी म्हणालो, थोडाच देईन !
कालच दोन डोळ्यांच्या चातकासाठी
आणि एका झुलत्या मोरासाठी
थोडासा पाऊस बँकेत ठेवून आलोय् !
मग मी त्यांना पाऊस वाटत राहिलो

तसे ते भिजत राहिले
……मधूनमधून नाचत राहिले !
शेवटी
एक
न राहवून म्हणालाच,
ए ! कुठून आणतोस रे पाऊस ?
आता मला हसू आवरेना
मी गडगडलो……बरसलो
आणि ते टपटपत राहिले
……पागोळ्या बनून.

## ६ समई

काळोख्या रात्रीच्या घट्ट मिठीने
मी
अंधारलो आहे आतबाहेर
कुणी तेल देता का थोडंसं ?
माझ्या घरात दिवा लावायचाय्
बुबुळांनी दिशा बदलल्या तरी
पापण्या मिटत का नाहीत ?
माझा देह गाव झाला तरी
अंगभर काळोखाचेच हुंदके अनावर,
मग कुठून बरं ऐकू येतय्
हे मंदसर प्रकाशगीत ?
……………………
ह्या गावाच्या वेशीबाहेर समयांची घरे आहेत.

७ थेंब

पिवळ्याधम्म
गोजिरवाण्या
गोड फुलावर
ओठ अनावर
एक निसटला
...टपकन्
थेंब टपोरा
रंग बावरा
नितळ गोरा
दावीत तोरा.......
ओठ कळीचे
थरथरणारे
हळूच कोणी
अलगद
अलगद
टिपून गेले
पाकळीचे
राजस अंग
किती तरंग
शहारले
मोहरले
सावरले

पदरावरती
दोन जुळे स्वर
नवथर
नवथर.......

परदेसीचा
पिसाट पिंगा
अनाम भुंगा
गुंजन गुंग
गुंजन गुंग
करितो दंगा
झिम्मड झिंग
झिम्मड झिंग......

अता कळी
हसे खुळी
कुणी पुसे
कशा मुळे ?
कशा मुळे ?
तुम्ही खुळे !
तुम्ही खुळे
लाजुनि म्हणते
रुजल्या रे
पिवळ्याधम्म
गोजिरवाण्या
किती कहाण्या !
किती कहाण्या !

## ८ तुझी ती कुठेय ?

रस्त्यात त्याने हटकून विचारलं,
तुझी ती कुठेय् ?
शर्टाची गुंडी काढून म्हणालो,
        ठेवली आत लपवून !
म्हणाला, सगळे जण असेच म्हणतात
म्हणालो, सगळ्यांचे शर्ट सारखे नसतात ! !
तो हसला फिस्कन्.......जिभेला कुरवाळीत
मी हसलो ओठ दुमडून
न जाणो ती पटकन् बाहेर पडेल म्हणून !
तो वळला......पाठ फिरवून म्हणाला,
कविता करणं बंद कर !
रस्त्यावरल्या ट्यूबवरची पाखरं फक्त रात्रीच जिवंत होतात
आपण साले बदफैली, साऱ्या ट्यूब डोळ्यात दडवून ठेवतो
म्हणालो,
गप्प बस ! वाटा तुझी वाट पाहतात ! !
तो गेला तुरुतुरु, हातात चिमणी काजव्यांची.
दुसरा भेटला पाणवठ्यावर
म्हणाला, तुझी ती कुठेय् ?
शर्टाची दुसरी गुंडी काढून म्हणालो,
        ठेवली आत लपवून !

म्हणाला, सगळयांचे शर्ट सारखेच असतात
म्हणालो, तुला फक्त छातीवरचे केस दिसतात ! !
तो क्षणात काजळला,
रात्रीमध्ये मिसळून गेला
कालाकुट्ट अंधकार बराच वेळ हिंदकळत राहिला.
तिसरा दिसताच कडकडून भेटला
एक डोळा बारीक करून म्हणाला,
तुझी ती कुठेय् ?
शर्टाची तिसरी गुंडी काढून म्हणालो,
ठेवली आत लपवून !
म्हणाला, डँबीस ! किती दिवस ठेवशील दडवून ?
म्हणालो, तिला पाहताच तुझा मृत्यू होईल म्हणून ! !
तो दुखरा, केविलवाणा, क्षणार्धात अंतर्धान पावला
सारा रस्ताच एकाकी माझ्या डोळयात सांडत गेला.
नंतर कुणीच भेटलं नाही.
मीही उदास, रूखासूखा, उत्सुकतेने
हळूच शेवटली गुंडी काढली.. ...
माझ्या उजाड छातीवर कवितांचे व्रण
जागोजाग
रातोरात......
डोळे मिटून मीही हळूच मला विचारलं,
तुझी ती कुठेय् ?
तुझी ती कुठे ?

## ९ रस्ते

हे रस्ते ज्या दिशेला वाहतात
तेथेच माझे घर आहे
घुसमटलेल्या आवाजाने कोणी अनोळखी
माझ्या शरीराची दारे उघडतो
आणि
उन्मत्त प्रवाहासारखा मी फुफाटत बाहेर येतो,
माजलेल्या रानटी गवतासारखा सरपटत जाताना
मला डोळे दिसतात पाळीव सूर्यांचे
माझ्या हातांच्या बलदंड मिठीने त्याच्या गळ्यातून
किरणे लोंबू लागतात
तसे रस्तेही पसरत जातात
बेफाम विजेची भूगर्भस्थ स्पंदने अंगांगातून
पाझरताना
क्षितिजाच्या अर्धस्फुट तणावांनाही जाणीव होते
माझ्या पावलांची
जेव्हा
वळत्या पावलाने माझे हात गारठून जातात
सगळे रस्ते माझ्यामागे
चेहऱ्यानिशी उभे असतात.

त्या दिवशी तो भेटला
खूप बोलावंसं वाटलं म्हणून हॉटेलात शिरलो
तो अजूनही गप्पच......
तो बोलेल म्हणून चहा मागवला
त्याने निमूटपणे पाण्याचे दोन ग्लास रिकामे केले.
अजूनही तो गप्पच !
चहा खूप गरम म्हणून मी फुंकून फुंकून पिऊ लागलो
त्याने घटाघटा चहा संपविला
आणि हात चोळीत वेटरच्या फाटक्या शर्टाकडे पाहात राहिला
मी विचारलं
तू राहतोस कुठे ?
त्याने हॉटेलमधली धुळकट ट्यूब निरखून पाहिली.
करतोस काय सध्या ?
त्याने माझ्या टेरीकॉटच्या शर्टाची बटन्स मोजली.
आणि आज इकडे कुठे चालला होतास ?
त्याने दुकानाबाहेरच्या खुरडत चालणाऱ्या भिकाऱ्याला पाहिलं.
.......शेवटी ओशाळून मीच गप्प झालो
आणि त्याच्या उसवलेल्या शर्टाचे काजे
मनातच शिवू लागलो.
.......त्याने माझ्याकडे पाहिलं.......
........................
त्याचे नागवे डोळे आभाळ बनले
आणि क्षणात मी समुद्र झालो.

## ११ मनाच्या

मनाच्या डोहात
टाकला मी खडा
एकही शिंतोडा उडेचिना—
मनावर कोणी
कोरली पापणी
तरी कसे पाणी वाहेचिना—
मनावर अशी
दाटू लागे साय
तरी कशी माय दिसेचिना—
आता कळो आले
आटलासे डोह
तरंगांचे मोह खुळ्यालागी—

## १२ फुंकर

तापलेल्या तारांनीच उभारले घरदार
निखाऱ्यांचे बसविले एक एक कौलार
लाल लाल ज्वाळांनी रंगविल्या भिंती
काजळलेल्या सळयांच्या लावल्या सांजवाती
माझ्या उभ्या देहा तुझी प्राणज्योत आवर
कधीमधी बरसेल वळवाची फुंकर.

## १३ मी

अरण्यातून एकटाच चालताना
दिशांचेही हुंकार पायाखाली चिरडून टाकले
कुणाचेही चेहरे मला दिसत नाहीत
तरीही ही कुजबुज कुठून ऐकू येतेय् ?
मी सगळी पानगळ
पिऊन टाकतो
आणि......पाहतो,
माझ्या थकल्या पायांखाली
आभाळाची प्रचंड पोकळी झुलत असते.

## १४ भेट

म्हणालीस......मला भेट दे !
म्हटलं......मलाच घे !
म्हणाली, नको !
पेक्षा तुझ्यातला तू काढून ठेव
मग स्वीकारीन तुला !
........आता चालतो तेव्हा
लोक हसतात मला
माझ्यामागे सावली असते तुझी
आणि पुढे लख्ख ऊन !

## १५ तोही

अधूनमधून पडावीत स्वप्ने......सुखाची
आणि व्हावे खडबडून जागे खोट्या भीतीने
तसेच आम्ही सारे सैराट झालोत!
म्हणतेस खरी की व्हावे मोकळे
पण आम्ही सारे जायबंदी बद्द माथ्याचे!
रस्तेही आहेत मोकळे गर्जत फिरायला
पण आम्ही सारेच ओठशिवीने पछाडलेलो!
.................................
तो माणूस हॉटेलातून बाहेर पडतो.
.............................
सांगू नकोस आम्हाला त्याची गौरवगीते
त्यास विचार,
तोही
आमच्यासारखाच
रिफाइन्ड तेलातली भजी खाऊन बाहेर पडलाय्!

## १६ होवो

तिला प्रथमच शिवलेला कावळा
पळत येऊन माझ्या कानात म्हणाला,
तिला बंदिवान करून आलोय् पुरता
तुझा प्रवास सुखाचा होवो!

पालव

## १७ सजण

दूरदेशीचा सजण......मला संदेश धाडतो
ओठ जास्वंदी लाजाळू......जीव मायेने वेढतो—
दूरदेशीचा सजण......अंगी खट्याळ शहारा
त्याचं सैल बोलावणे......किती चुकवू पहारा—
दूर देशीचा सजण.... लावी कलागती नामी
आणि अमृताच्या डोही.......रूप पाहते बदामी—
दूरदेशीचा सजण......असा अवेळीच जातो
त्याच्या तांबूस दिठीचा......रंग पहाटेला येतो—
दूरदेशीचा सजण......त्याची खळाळते वाणी
कधी गारव्याच्या राती......गाई अलवार गाणी—
दूरदेशीचा सजण......अशी होते धूळधाण
तरी ओढाळ हे मन......करी साजण साजण—

## १८ प्रवास

तुरुतुरु धावणाऱ्या मुंगीला विचारले
तुझा प्रवास कोठून कोठे ?
तिच्या कुजबुजण्याचा अर्थ कानांना समजत नाही
की माझ्या शब्दकोशात
पाचव्या युगाचे नावच नाही ?

## १९ तिरीप

आणि जेव्हा मी वात्स्यायन झालो
तिने मला झोपडीच्या दारातून हाक मारली
ट्यूबच्या खांबाखालीच मी माझा प्रवास संपविला
तशी ती कुजबुजली, वहाणा हातात घे
लोक जागतील !
किरट्या अंधारात अक्षर कोरणारा तिचा घोगरा आवाज
राकेलच्या दिव्यावर भुरुभुरु जळून गेला
आणि करकरणारे दार आपोआप सरकत आले
तसे चंद्रप्रकाशाचे कितीक थवे डोळ्यामधून पसार झाले
ती म्हणाली,
        बाहेर म्हातारी खोकते फार
        जेव्हा असतो येथे काळाकुट्ट गर्द अंधार
चिरत जाते तिची हाक उजेडालाही आरपार....
मी म्हणालो, हे कुणाचे पाऊल
ती म्हणाली, हळूच ! उठेल ना रे मूल !
वात्स्यायनाच्या डोळ्यात तेव्हा मिटण्याची चाहूल...
......म्हातारीची कोंदट हाक
        माझ्या मनात अक्षर झाली
उजेडाची एक तिरीप
        तिच्या गालावर सरकत गेली.

## २० मायबापहो

तुम्ही म्हणाले.......शब्दांचे सौदे कशास करता ?
आम्ही अर्थांचे जकात परवाने रद्द केले;
तसे तुम्ही म्हणालात.......गंधांची उधळण बंद करा
आम्ही फुलांचे ओठ कापून तुमच्या हवाली केले
तुम्ही कुरकुरलात...झाडांची पाने डुलतात फार
आम्ही वाऱ्यात जाळली वांझ दुपार
तुम्ही म्हणालात...हे गाणे कसले उफाळून येते ?
तसे आम्ही लाजून म्हणालो, ती कोकिळा उगीच गाते
तुम्ही हसून काढला फतवा
की
आता
.......कविता करून जगून दाखवा
दिलेत आम्हाला मानधन,
केली उगाच थोडी गंमत
मायबापहो, खरं सांगा
याहून कितीतरी जास्त असते
वेश्येच्या पडलेल्या पदराची किंमत !

## २१ चांदण्या

डोळे गच्च मिटले की
आभाळही डोळ्यात दाटून येतं म्हणे !
मला ते ठाऊक नाही
माझ्या पापण्यांच्या केसात
चांदण्या कधीच्याच बसल्यात दडून.

## २२ रंग

मेंदीच्या झाडाखाली तिने रंगण्याचा हट्ट धरला
तो म्हणाला,
तुझ्या हातावर पाने चुरताना माझेही
हात लाल होतील त्याचे काय ?
ती म्हणाली, ठीक !
आणि हात पसरून मेंदीखाली उभी राहिली
तसे त्याचे हात लाल होत गेले
.......ती शेलाटी
थरथरत राहिली स्वतःच्याच भारानं
आणि त्याच्या हातावरल्या चिरेमधून पाझरणाऱ्या
एक एक रक्ताच्या थेंबाचा
गुलमोहर झाला

## २३ स्मित

झाडावर काळोखाची अंधुकशी हालचाल झाली
आणि तिचे लाजभिऊ डोळे मिटू लागले
...पंखावर चोच घासून त्याने तिला जागे केले
तशी तिची देहवस्त्रे आभाळात तरंगत गेली
.......काळोख मिट्ट
झाड स्तब्ध
आयुष्यात प्रथमच तिने काळोखात
एकदा स्मित केले
आणि डोळे गच्च मिटले

## २४ सडा

तिची एवढीच चूक
तिने रस्त्यात फुले अंथरली
तुम्हाला ती प्रेताची वाट दिसली...
तिचे हेही चुकले
फुलांसोबत थोडे कुंकूही सांडले
आणि तुम्ही सगळे खांद्यांसाठी भांडले
आता पडतो रस्त्यारस्त्यावर
लालजर्द गुलमोहराचा सडा
......आभाळाएवढा !

## २५ नियम

लाजणे
रुसणे
हसणे
माझ्या ओंजळीत एक त्रिदल !
तीन पाकळ्या ........ हव्याहव्याशा !
आणि तू म्हणतेस ........ हे आहेत त्रिविध ताप
आधिदैविक........ आधिभौतिक........ आध्यात्मिक
राणी ! आता आपल्या चंद्राने
उद्याच उगवावे हे बरे
म्हणजे माझ्याही ओठांना तोपर्यंत माहीत होतील
त्रिस्थळी यात्रेचे सर्व नियम !

## २६ डोळयात

डोळयात अंधाराची पूड फेकून
दिवस जेव्हा फरारी झाला
तेव्हा तुझ्या हातावर मी घड्याळ काढीत होतो
म्हणालीस,
मी वेळाचे आकडे काढीन
तू फक्त काटे दाखव...
रुसून बोललीस
तू एकच काटा दाखविलास
तसे बारा आकडा गोंदवून म्हणालो
दोन्ही काटे एकच झालेत कधीचे.......
तुझा तळहात अधिकच ताठ
बोटांची मिठी घनदाट
बाहेर काळोखाचा धूर
डोळयात....... असीम...... अफाट !

## २७ हॅलो कोण ?

हॅलो, कोण इंजीनिअर ? बोला साहेब !
छे छे ! आम्ही कुठले साहेब ! आम्ही चाकर
( भडव्या ! तुझीच खातो भाकर )
हॅ हॅ हॅ ! बोला ग्रेट
( झेलतो थुंकी तुझीच थेट )
हुकूम काय ?
( पुरायचेत तुझे पाय )

बोला बोला...
( तू मुळीच नाहीस भोळा )
मला हवंय् मिक्सचं प्रमाण :
वन : टू : फोर
वन : फोर : एट
वन : थ्री : सिक्स
( तुझी वरती जागा फिक्स )
काय बुवा ! करता टिंगल
( सावध ! आजूबाजूस वाढले माणसांचे जंगल )
आम्हाला यातले काय कळते ?
( तुझ्यापायी आकाश जळते )
मजदूर थांबलेत......श्वास लांबलेत
पाठवा :—
चार पाट्या माती — तुम्हाला जन्म देणारी
दोन गोण्या वाळू — समुद्रावर तुमचं घर बांधण्यासाठी
आणि एक पोतं तुमचं ताजं गरमगरम मांस, चरबीयुक्त
थांबा ! ऐका ! ! साईटवर पाणी नाहीय् !
तुमच्याच कुळाच्या रक्ताचं कनेक्शन बसवा
ट्वेन्टीफोर अवर्स !
( तुम्ही ? ? यू आर अ फूल )
फूल ? ? हां हां हां !
फूल........ फूल........ मला पडली भूल
( रॉंग नंबर ! )
निखळलेय झुंबर
ट्रिंग ट्रिंग
अिरींग मिरींग लवंगा तिरींग
लवंग्या तिरींगात लफंगा कोण
गाथी गोपी उतरला फोन.

## अंगठा

सुसाट पळणाऱ्या मुलाला पाहून
खुरडत चालणारा एक भिकारी
खुदकन् हसला
आणि
मैलाच्या दगडाशेजारी
पायाचा अंगठा कापून
त्याने हळूच उभा ठेवला
परतणाऱ्या मुलाला बसायला जागा हवी म्हणून !

## २९ हुंकार

तुला आणि मला दोघांनाही माहीत
तरी तुझे उगाच ........
मला काही म्हणालास ?
तसा मीही ........ छे गं कुठे काय ?
आणि काळोखाची दगडबंद मिठी ........
मला वाटलं तू काही तरी म्हणालीस !
छे रे ! कुठे काय ?
अरेच्चा ! मग हुंकार कुठून येतायेत मघापासून !
आपण दोघेही खोटे बोलतो,
किंवा —
मग ओठावरला शब्द तटतटून फुटत कसा नाही ?
की त्याचाही उद्‌गार
कुणी असाच ऐकतोय् चोरून !

## ३०   नदीच्या कविता

१. नदीकाठानं चालताना
तिला वाटेत फूल लागलं
तशी ती काठाकाठानं फुलं वेचीत गेली
आणि ती जिथे थांबली
तिथे पुष्पवाटिकेच्या मध्यभागी
एक काळसर्प मस्तवाल पहुडला होता
वेडाच्या भरात तिने त्यालाही हुंगलं
तशी ती हिरवी निळी होत गेली
तिने अंगावर गोंदलेल्या फुलात
एक हिरवा निळा डाग आहे.

२. काठावर उभे राहून
तिने त्याला वचन दिले आजन्म सोबतीचे
आणि वाळूत पावलंही उमटू न देता
ती निघून गेली.
त्या दिवशी ती दोघं
नुकत्याच पाऊसभिजल्या काठावर उभी राहिली
आणि बघता बघता पाण्याचा रंग लाल होत गेला
ती म्हणाली,
आता आपणाला मिसळण्याचा अर्थ कळला.
तो थांबला........ नंतर हळूच म्हणाला,
प्रेमाला ऋतू नसतात.

३. पुराच्या अवखळ पाण्याची तिला ओढ वाटायची
म्हणून ती त्याच्या सोबत पाणी पाहण्यास आली
गढूळ पाण्यात पाय बुडविताना

नखावरल्या लाल खुणाही दिसेनाशा झाल्या.
तसे तिने पाण्यावर पाहिले
वेगाने धावणाऱ्या पाण्यावर तिला एक प्रेत दिसले
क्षणभर ती घाबरली........
नंतर तिला बरे वाटले
एक जिवंत अनुभव म्हणून तिने त्याला
निरखून पाहिले
तशी ती चपापली............
प्रेताच्या बोटातल्या अंगठीत त्याचाच खडा होता.

## ३१ सप्तक

सप्तकातले
ऋषभ, गांधार वाट चुकवून रस्त्यात भेटले,
तुझ्या काळजाला गाण्याचे पंख फुटले
गर्द गळ्यावर आपणही कोरले
फुले तुझ्याविण सुकली रे.......
फुले तुझ्याविण सुकली गं........
आणि व्याकुळतीच्या खुणा
शरीरावर टाचून ठेवल्या शब्दाशब्दाने
जाता जाता म्हणालीस,
साती जणांना बोलावते सप्तपदीला
सगळे सुख सुसह्य होईल
तुला....... मला.......
आताशा पंख फडफडतात फार !

तर मी तुम्हाला सांगत होतो एक गोष्ट
तिच्या ओंजळीतल्या फुलांची
फुलं ........ आगीची ........ वादळाची
        कडाडकड बरसणाऱ्या मेघाची
आणि दूर क्षितिजपार भिडलेल्या समुद्राच्या ओठांची
ती फुलं ही नव्हेत जी गळतात
आपल्याच जडभार देहाने झाडावरून
किंवा झडतात शिशिराच्या अतिरेकी बर्फभिंतीतून !
त्यांना कधी पाहिल्याचेही आठवत नाही तिला
पण त्यांचे गोंदलेले स्पर्श ती अजूनही
रानपाखरांना पापण्या उलगडून दाखवीत सुटते
आणि फांदीफांदीवर उतरलेल्या संध्याकाळीत
चोच बुडवून पांखरेही मुकाट मुकाट होतात
तिला ठाउक नव्हता त्या फुलांचा गंध
उन्मादक ........ बेभान ........ तसाच अवगुंठित
पण तिच्या धगधगत्या तळव्यातून मी भोगली
लालभडक गुलमोहराची पेटती आग
आणि मी पाहिले किती तरी पारिजात
तिच्या धपापत्या उराच्या समेत सडसडून झडून जाताना !

आता मनाच्या डोहातून आठवणींचे पट्टे
सरसरत आभाळभर जातात
आणि डेकनवरचे सारेच रस्ते तिच्या
डोळ्यांखालच्या काळ्या वर्तुळासारखे
माझ्याभोवती गरगरू लागतात

आता चौकात स्मारक उभारण्यासाठी
कोणत्या घरंदाज मातीचा लिलाव पुकारावा ?
मला थोडीशी जागा हवी आहे
दिशा दाखविणाऱ्या सिग्नलच्या खांबाएवढी.
आम्ही शोधत होतो अवघड वाट
पण जेव्हा ठेचाळलो तेव्हा कळले
आमच्याच रक्तात तिने इंद्रधनुष्याचे सातही रंग
बेमालूम मिसळले होते

तशी ती वेगळीच
ग्रेट म्हणावी अशी !
आकाशाला गुदगुल्या करून मस्त पाऊस पाडावा।
कोकिळेचे कान पकडून गाणे म्हणवून घ्यावे
आणि चंद्राला गळसरीत मनसोक्त मिरवावे
........ असं म्हणणारी
जेव्हा तत्त्वाच्या तिठ्यावर उभी राहिली
तेव्हा गजाआडचे तिचे हात पोलादाचे झाले
मी म्हणालो, सुकून जाशील, जळून जाशील ह्या आगीत
तशी म्हणाली, जे बांधले नाहीच घर
त्याचे दार उघडू कशी
मी अशीच फिरवीत राहीन, जिरवीत राहीन
एक एक प्रकाशाची लकेर
या मातीच्या शेकडो आत्म्यांमधून या देहात
अरे ! जर स्वातंत्र्य खोटे, जळणे खोटे
तर वणव्यात उजळून निघणारे पक्ष्यांचे थवेही खोटेच !
आणि गजांवर ताल धरून म्हणाली,

इथे येण्यापूर्वी ऐकलेला मारवा आठवतो तुला ?
आपण आता गाणी गाऊ या
आ जा सनम............
पक्ष्यांच्या चोचींतून निसटलेले दाणे मी
तिच्याच दातांनी खाल्ले
शहरांमधले किती तरी संदर्भ तिच्यामधून वहात गेले
एकदा म्हणाली,
रस्त्यांचा काळा रंग खरवडला तर
आतून दुधाच्या नद्या वहात असतील
मी म्हणालो,
आपण जरा रिॲलिस्टिक बनू या
तुझे एम्. ए. काय म्हणते ?
तशी जीभ लांब काढून म्हणाली,
विसरलेच रे सांगायचं !
परवा हमीदचं वर्षश्राद्ध करणार आहे
ब्राह्मण म्हणून बसशील ?
शिवाय त्या दिवशी रात्री तळ्यातल्या गणपतीसमोर
सामुदायिक कुराणपठण करणार
आणि प्रसादाला रस्त्यांच्या पोटांमधून वाहणाऱ्या
स्वच्छ दुधाची बासुंदी !
........ वेडी का तू ? त्यामुळे काय होईल ? ........
अरे ! रस्त्यांवर चौकाचौकांत दुधाची कारंजी फुटतील
आणि ....................एकदम थांबून म्हणाली,
आपण कधीच का रे आतबाहेर स्वच्छ होणार नाही !
तिचे थरथरणारे हात थोपटीत म्हणालो
बघ ! तुझ्यासाठी पांढरी शुभ्र जाईची फुलं आणलीत
ओंजळभर........
तिच्या हाताला धरून रस्ता ओलांडताना

प्रथमच जाणवले की
तिच्या हातावरल्या रेषा माणसांच्या प्रवाहानुसार बदलत नव्हत्या.

आणि त्या दिवशी
ग्लासला गेलेला तडा शांतपणे न्याहाळीत ती म्हणाली,
........ माझ्यासाठी मुलगा शोध
आता लग्न करावेसे वाटते ........
तसा हसलो फिस्कन् !
म्हणाली, का हसलास ?
आताशा हा मोकळा गळा रात्री खुपतो रे
कुणीतरी चंद्रखुणा गोंदाव्याशा वाटतात गालावर
........ कसे कुणास ठाउक आतले गाणे हलले खरे
पण डोळ्यातले रंग मालवून म्हणालो,
एक चांगला मुलगा आहे ........ इंजीनिअर ........
तुझा गळा भरून जाईल
आणि
डनलॉपवर बसून तुला आयुष्यही बिनधास्त
चघळता येईल ........ कॅडबरीसारखे ........
तिच्या चेहऱ्यावर पसरले जसे तृप्तीचे शेवाळ
तसे पुन्हा एकदा कळले
समज आणि उमज ह्यांत दोन क्षितिजांइतके अंतर असते.

परवाच ती दिसली
घाईघाईत जाते रे म्हणणारी
तिच्या स्थूल चेहऱ्यावरून सगळे कॉर्नर
घामासारखे ओघळून गेले

मी विचारले, फुलांचा शोध काय म्हणतो ?
ती बेचव हसून म्हणाली,.... ते काम माळी करतो.......
गरर्कन् वळलो
फुलांचा कापूर डोळ्यांदेखत जळून गेला
तिच्यासोबत घेतलेला कॅफेतला चहा
आयुष्यात प्रथमच कडूजहर लागला
नंतर मी जेव्हा रिकामा होऊन हिंडत होतो भणंगासारखा
तेव्हा हसत खिदळत पफ् घेणाऱ्या सर्वांचेच मला आश्चर्य वाटले
एकाला विचारले,
तू इतका साहजिक कसा झालास ?
ग्लास उचलून तो म्हणाला,
आपल्या आधी ह्याला किती जणांनी उष्टावलय् माहितीय् ?
.......अरे ! तिलाही अशीच पिऊन टाक
सगळे काही पचून जाईल
वाटल्यास दारात कॅक्टस लाव शोभेसाठी
गंधगार फुलांची वाट पाहण्यात वेळही चांगला जातो

सध्या माझ्या दारात आहे कुंडी ....... फुलगच्च !
तुम्हाला फुले दिसणारही नाहीत
कारण मी कधीपासून त्यांना ओवतो आहे माझ्या गोष्टीत
एक गोष्ट......
तिच्या ओंजळीतल्या फुलांची.......

## ३२ आपण कसे

आपण कसे असायचे असते
आपण कसे हसायचे असते

पानावरल्या थेंबासारखे
हळूच पुसून जायचे असते
क्षितिजावरले गाणे कधी
डोळ्यांत टिपून घ्यायचे असते
हातावरल्या रेषांनाही
मनात मोजून घ्यायचे असते
नशीब नशीब म्हणता म्हणता
हळूच कपाळ पाहायचे असते

आपण कधी कसे असतो
हे मुळीच माहीत नसते
आपण तसे कधीच नव्हतो
असेच पुन्हा सांगायचे असते
चांदण्यासुद्धा कशा हसतात
ढगसुद्धा कसा रडतो
पानात कशी सळसळ येते
ओठात शब्द कसा अडतो
असे प्रश्न आले की
आपलेच आपण हसायचे असते
कधी उत्तरं दिसली तर
डोळ्यांवरच रुसायचे असते

कधी कधी उदास होऊन
एक गाणे गायचे असते
पापण्यांमध्ये पाणी आणून
उगाच उगाच रडायचे असते
डोळ्यांनाही टिपताना
हृदय पुसून घ्यायचे असते
आयुष्यातील एक पान
हळूच गळूच जायचे असते

कधी कधी जमलेच तर
एक गीत लिहायचे असते
कागदांवर शाईसारखे
रक्त ओकीत जायचे असते
आपण असे ठरवायचे की
खूप खूप जगायचे असते
वरून हाक आली की
हळूच ओ द्यायची असते
हिशेबाची वही घेऊन
घेणे वसूल करायचे असते
जगणं सारं संपलं की
हळूच मिटून घ्यायचे असते

आपण कसे असायचे असते
आपण कसे हसायचे असते

प्रेतावरल्या फुलासारखे
आपण आत हसायचे असते

चितेखालच्या राखेसारखे
चिमूट होऊन जायचे असते
शेवटच्या पाण्यासाठी
घटकाभर बसायचे असते
जाता जाता चितेवरती
थोडेफार रुसायचे असते.

## ३४ जागी

हिरवागार चुडा भरावा
ढळढळीत कुंकू रेखावं
डोळ्यांच्या कडा ओढाव्यात
केसात फूल खोवावं

अशा लावण्याचे दिवस
तिने शरीरावरून ओवाळून टाकले
आणि लालचुटुक ओठावर
टचकन् काटा रोवला

आयुष्याचा रस्ता सापासारखा
सरसरत भिनत जाताना
ती अधूनमधून पहाटेच्या प्रहरी
पोटऱ्यांमधून वाहणाऱ्या रक्ताने जागी होते
सुजलेल्या ओठाला चाचपून पाहताना
समाधानाने डोळे मिटते

## ३५ तीळ

ओळीस लाविता चूड
हाकेवर दिसले गाव
शब्दांच्या राखेमधुनी
मी तुझे जुळविले नाव

तू कुठे दडविली ओळी
ती राखणकंठी गाणी
तू कोकिळता, मी पुसले
हे गाव वसविले कोणी

तू पाऊल टाक जपून
कुणी हळू बोलले तुजला
एकुलता एक दिवाही
अंधार ढवळता विझला

तू चालत अवघडलेली
कापीत कळांच्या रेषा
रातकिडे अवतीभवती
की किर्रर्र कठीण निराशा

अंधार किती हलवावा
कुणी खुडून नेले कान
मी तीळ हळू चाचपला
मृत्यूची खूण म्हणून !

## ३६ आयुष्य टेकण्यासाठी

वेदनेच्या असंख्य पाखरांनो
आज अनावर होऊन असे वसतीला या
वेगवान वाऱ्यावर आरूढ होणाऱ्या विजेच्या लोळांकडे बघा
तुमची आरोळी घनभेदी वातावरणातून
थेट चराचरात घुमत जाईल
आणि काळजाच्या चिंध्या चिंध्या होतांना
किती तरी कोवळलेले अंकुर मातीत चिरंतन गाडले जातील

ह्या अगाधस्पर्शी जाणीवांनो
आगीच्या ज्वाळांनी अंग अंग लिंपून टाका सारे
कातडीची सहस्त्र शकले छेदून भेदून अखंड
उन्मत्त काळावर भिरकावून द्या असीम होऊन
आणि रक्ताच्या थेंबाची थुंकी होण्यासाठी
लोचटपणाने गळणाऱ्या लाळेची पिचकारी
बिनादिक्कत मारा दिसेल त्या सुंदर चेहऱ्यावर

अरे सत्यशोधकांनो !
तुम्ही परवाच जो देह जाळून भस्मसात केलात
एका महारोग्याचा
लिंग – अंग – झडलेला
अंगणातल्या ताठ देवदार वृक्षासारखा
त्याखालीच तुमच्या कहाण्यांची नदी धो धो वहात होती
तुमचे पाय भिजलेत ते त्याच्या ओंगळवाण्या
औध्र्वदेहिक अस्मितेने नाही तर
त्याच्या शरीरातून

पालव

समिधांसारख्या झालेल्या अग्निदिव्य पायातून...
नखं झडलेल्या बोटांच्या हातातून
आयुष्याचे तर्पण करताना
सकाळ संध्याकाळ
तृप्यंताम् चा आसक्त घोष तुमच्या रंध्रारंध्रातून
वणवा पेटवील

तुम्ही पाहिले नाही काय ?
तुमच्या स्वर्गस्थ सावल्यांच्या
हिमगर्द रंगांची कुचेष्टेखोर बरसात
अरे हा घनविभोर पाऊसही
अंग अंग जाळीत नेतो रे त्यांच्या जखमांतून ......

सपासप वार करीत जाव रस्त्याने
तसेच होते तुमच्या दयेच्या भिकारड्या शब्दाने
आकाशपोकळीत विखुरलेल्या भाग्यवंतांची
महावस्त्र ल्यालेली ही निवडुंगाची लेकरं
तुमच्या अभेद्य कातडीची रक्षणं करायला

अवतीभोवती सज्ज आहेत
त्यांना दटावू नका कुंपण बनून
अरे काळ्यांची वंशवेल उरीपोटी जागवणारी
ही मायास्वस्थ कुळं

कृतार्थ होतील तुमच्या पौरुषहीन बर्फगार आठवणींनी
तुमची पेटती तगमगही त्यांना माहीत झालेली
तुमची बेगडी कारणमीमांसा त्यांनी पानापानांतून
वाचून घेतलेली

तुमच्या बुबुळातला आसुरी अंधकार आणि
दारुण आनंदाची लकेर
त्यांनी आपल्या जखमांवर दाबून धरलेली
अरे थांबू नका स्वातीच्या बछड्यांनो
घरे सोडून दारे तोडून फुटक्या पायऱ्यांवर

पाय टेकण्याचा प्रयत्न करा
छपरातून घुसणारे सूर्यलोळ तुमच्या काय कामाचे ?
किती तरी बिलंदर काजवे माणसांच्या झाडाझुडुपातून
क्षणोक्षणी लपकत झपकत
तुमचे पांगुळगाडे ओढत असतातच
त्यांतील एखादाच सिटता सिटता
तुमचे आह्निक उरकून मार्गस्थ होईल
आणि तुमचे हात बुलंद पोलादाचे
कणखर दगडाचे
काळाच्या कराल लेण्या खोदताना
झिजून जातील ....... खुजे खुजे होत जातील

अरे बूर्झ्वासती तुमच्या कहाण्या
कर्दळीचे डोहाळे तुमच्या स्त्रियांच्या गर्भाशयाला
आकाशगंगेचे किती तरी लोचट चंद्र
ओंगळ देहातून लपवून ठेवलेले तुम्ही
मंगळाची पृथ्वीभेदी किंकाळी
आणि शुक्राची गलेगच्च थाप तुमच्या शाही शृंगारावर
पाकळ्यांचे लिलाव उरकून पुढचे पाऊल
टाकणाऱ्या नतद्रष्टांच्या राज्यात एकवार
सूर्यमाला निखळून उधळून द्या रे इतस्ततः सारे ग्रह
आमच्या श्रमगाथेची पाने तरी अशी

कोरीच फडफडणार नाहीत ……

आम्हाला पाह्यचाय् गुरुपुष्यामृताचा योग
नव्या भावुकभोळ्या ग्रहांवर प्रकाश भरून ……
पाहायचीय शनीची सुसाट धावाधाव आमच्यापाठोपाठ
समजवायचंय् त्याला …… थोपटीन म्हणतोय्
हाताने रेषा पुसून …….
पाह्यचेत शुक्राचे मदमद डोळे बेफाम …… बेहोष
आणि तंतूंची चिवट चिकाटीची महायात्रा
माती उधळून उधळून संपवायचाय् आसमंत ……. अनंत
उतट मातट आकाशावर बरसायचेय् उधाणून
समुद्र ओंजळ भरभरून उडवायचाय् त्याच्या अंगावर
पार भिजवून टाकायचंय् आभाळाला
झपकन् चमकवायचीय् विजेरी चांदण्यांची

आणि अखंड उदी कॅनव्हासवर
रेखाटायचा आहे अमोघ उत्कट अशा
संधीगर्व ढगांचा मनसोकळा उधाण कुसुंबी रंग
किती तरी गालांचे, ओठांचे फोटो टिपून घेणार आहे
क्षितिजादेखत
मला हात हवे वेलबुट्टीदार दिवसांचे
मला दात हवे विजेरी हास्याचे
मनाच्या तळात दडून बसलेला कुणी पांथस्थ
मला हुडकून काढायचाय्
मला गळा हवा दाटून आलेलं नभ कवळून धरायला
मला शरीर हवं
पंचमहाभूतांच्या पाच राण्यांची विश्रांतिस्थानं सजवायला

अरे कळागर्भ पाखरांनो
जाऊ नका दूर
तुमच्या विस्तीर्ण पंखांवर
विस्कटून लिहिलेले वैश्विक संदर्भ
देहाची प्राणमुखी दारे हिंदकळून तर टाकणार नाहीत ना

आता वाटते
काळसर्पाने शरीरावर असा दंश करावा जागोजाग
की वेदनेचे वधस्तंभ उभारण्यास
मृत्यूला आकाशवृक्षाची यादही डसू नये
भयाझाकोळ मनातून सरसरत चढणाऱ्या विषात
तिच्या शेजेची फुलं
आणि मिठीतली कळदार गात्रं
नुस्ती अनोळखी अनोळखी होत जावीत
झडलेल्या बोटातून तिला अंगठीसारखे वर
सरकवताना
दुःख नसेल तिच्या अंगठी होण्याचे
जाणीव राहील फक्त
झडलेल्या बोटांची
आणि समाधान वाटेल
आयुष्य टेकण्यासाठी असलेल्या
विश्रब्ध पाखरांच्या पंखांचे !

१ आभाळाच्या ओल्या ओठातून पसार
भुईवर धारा धुवांधार
तशी तुझी करुणा अपरंपार
घुसमटून गरगरत गेलेली किती तरी वादळं
अमोघ ....... आंतरिक कर्णस्थलातून
पाझरणाऱ्या संतत शब्दस्रावातून
जुळविली ढगांची कुळं
आकाशाला सुसाट विस्फोटित वाऱ्याचे गोत्र
अनंत अफाटतेची विस्मयकारक प्रवरं
जमिनीचे रखरखीत आचमन
आणि पावसाचे स्वच्छस्वर आत्मदहन
वावटळीत जन्माचीच वेळ ढवळून...घुसळून निवाली

२ पाऊस
एक आत्मनिर्भर श्वसन
अशा परवापरवाच्याच गोष्टी
किती किती आठवायच्या ?
असा पाऊस नयनविभोर
पापण्यांची दारे सताड उघडून
मुसमुसत वहात राहिला
पावसाची लेकरं घरभर ...... मनभर
भिज्ज ...... किच्च ....... ओल तशी कणभर
अशी शिराशिर तुझे स्पर्श आणतात
देहभर ...... खोलवर !

३ पाऊस

कोवळ्या किरणांच्या तारा अवखळ गोंजारत
निनादत गुणगुणणारा परदेसी ......
आणि शरीरभर गळाजड नुस्ती उदासी
असे जीवघेणे खेळ किती सोसायचे
गच्च भरलेले आभाळ किती तोलायचे
असा अवखळ ......धावत धुडपत सरसरून येतो
शेंड्यावरचा चिंब राणा
कशी चोच मारून जातो कळत नाही
रात्रभर नुस्ता ठणका
ढगांचा आभाळभर धुडगूस
आणि विजेच्या कळा ओटीपोटातून

४ पाऊस

ओंजळभर कळ्या दडवून ठेवलेल्या तुझ्यासाठी
वाटलं एखादी अल्लडशी सर शिडकेल
कळी सुटी सुटी फुलाच्या वरी पडेल
पाऊस असा दुष्ट ...... छांदिष्ट
गरगरीत गारांची वावटळ धडकली सपासप
ओंजळीचंच झालं झाड
भरभरून वाहणारा वारा द्वाड
कळ्यांची कोमेज अल्याड आणि फुलांचे देठ पल्याड
आता उघडे ओठ ओंजळणारांच्या
सडासड शीवेला समोत्सुक
आणि पायापायावर कळ्यांची जन्मान्ध कुळं
दिशाहीन ...... मीही बधिर
कुणाला करू माझं अलवार फुलपण स्वाधीन ?

५ तुझ्या डोळ्यांत
        ओठात
        कानात
        गळ्यात
        छातीत ...... पावसाचे मंद सरसर ठोके
तू नखाग्रापासून नखशिखान्त
वर्षाधीन
पावसाचे दंश मिरवताना
पायापासून पाठीपर्यंतची ओली लगट
अस्वस्थ रात्रींचे कान फुंकते
तुझ्या डोळ्यांत पावसाचे चटोर चुंबन बुबुळ बनून
गळ्यात पाऊस एक लकेरधून ओलीकंच
तुझ्या गालावरल्या खळीत
पाऊस वसतीला थेंब बनून
आणि माझे ओठ पाहुण्यांचे
मी ते भिजत टाकतो तुझ्या खळीत
सूर्योदयाला ओले व्रण ...... खोलवर ......
खळीचे की कळीचे ?

६ पाऊस
उबदार संगमरवरी स्वप्नं
तुझ्या स्तनावरल्या चोरतिळांचे
पाऊस तुझ्या छातीत
आणि माझ्या ओठाला चटके टपोर कळांचे
तू बाहूंचे तोरण बांधू नकोस
एक तर हातातून ओल्याकिच्च पागोळ्या
        टपटपतात अक्षता देहस्वरूपी

आणि कानाशी गुंजत राहते
ओलेत्या चांदण्यांची किणकिण
असे आनंदयुग पावसाने ढगावर कोरून ठेवावे

७ मेघ, नभ, आकाश, आभाळ, वर्षा
ढग, आषाढ, श्रावण, वीज, बिजली
तू केस विंचरलेस आणि किती तरी थेंब ओघळून गेले
मी इतकेच वेचले
आणखीन भिजली असतीस तर हातच पाणावले असते

८ अशीच मेघदूताविषयी बोलत असताना
तू गप्प झालीस
खिडकीतल्या चौकटीतून आभाळ निरखीत राहिलीस
मी जवळ घेऊन विचारलं .........
...... आणि तुझे डोळे पाऊस
मी तुझ्याच पदराआड निवाऱ्याला
......... वेडा .........

९ पाऊस ... एक संदर्भ आपल्या अस्तित्वाचा
आपण बोलतो पावसात
हसतो, चालतो पावसात
जेवतो, हलतो पावसात
मग पाऊस म्हणजे ?
आपणच की आपलं अस्तित्व ?
तर पाऊस एक कोडं ...... एक प्रश्न
माझ्या बरसण्याच्या प्रश्नांना

तुझे भिजीचे उत्तर
मग पाऊस ?
पाऊस ...... एक पाऊस
नुस्ता ...... तुझ्या माझ्या ओठांसारखा
टिपाऊ ...... टिपकागद

१० पाऊस तुझ्या नसण्यात
 माझ्याही
पावसाचे सर्वथैव स्वागत रानोमाळ
पावसाचे किती तरी मोठे आभाळ
पावसाच्या सुया मातीच्या रंध्रारंध्रात
मातीला शृंगारवय फुटे अंगाअंगात
मग पाऊस कुणाच्याच नसण्यात
 दिसारातीच्या दिसण्यात
कधी कधी पाऊस तुझ्या माझ्या देहात
दिशाव्याप्त अवजड
पावसाला पाहणेही अवघड

११ असे जीवघेणे आयुष्य
देठादेठांतून फुटून गेलेले
मातीच्या गर्भातच रुजून बुजून गेलेले
पावसाचे आलाप क्रूर कठोर
कशी जपतेस एखादा अलवार सूर कळीत
फुटत नाही ना तो
पावसाचा काय भरवसा
आज हसतोय असा

उद्या मरणोन्मुख शीळांनी
झोडपून काढील भरदिवसा

१२ पाऊस ...... तुझी माझी हौस
तू त्याला पाऊस म्हणतेस
आपण दोघे आळीपाळीने पाऊस बनतो
मग पाऊस कोण ?
आपल्यातून आळीपाळीने निसटून गेलेलं
आयुष्य की आपण ?

१३ पावसाची माझी ओळख कधीचीच
जन्माचीच
तुला दाखवू ?
माझ्या पावसाचा रंग आवडेल तुला ?
पण तू रंगबधिर
तुझ्या पावसाला हिरव्या कळा आहेत
आणि माझा गर्द काळा
आता तू डोलू नयेस, हलू नयेस
आणि मी पाहू नये
म्हणजे आपले पाऊसही असेच
अनोळखी राहतील एकमेकांपासून !

१४ पाऊस
गर्भातील अस्पष्ट हालचाल
आणि तुझ्या ओठातील अतृप्त हुंकार
तुझे पान्हावणे

आणि धन्य पावसाचे जिणे
शब्दाशब्दातून निथळून जाताना
तू राव्याच्या जावळात बोटांनी पाऊस शिंपला
सडावून न्हालेली माती इतकी लाजभिजू
जितकी तुझी लांबसडक सरींची बोटं

१५ तू नकोच ना म्हणूस ढगांचे गाणे
माझ्या वळचणीला किती तरी पक्षी
पंख थरथर ओलावून ......
मी त्यांच्या चोचींत कोणता दाणा घालू
माझे ओठ गळाबंद ...... तुझ्या श्वासांनी

१६ पाऊस
निरर्थक ! तुझ्या-माझ्यातला पुसट शब्द
कुणी प्रथम खोडावा तो बरसेल
दुसऱ्याने भिजावे हा नियम
रुजण्याचे संदर्भ आकाशमार्गी
जांभळया क्षितिजावर सोपवून
आपण फरार ...... सांजोल पावसाधीन !

१७ रस्त्यारस्त्यावर खोल खड्ड्यांचे तुरुंग
कुणी तुडवत जावे पावसाला बेदरकार
पाऊस निःशब्द ! त्याचे गडगडणे एकच !
भिजू नका ! पागोळ्यांनी सजू नका !
मग तुरुंगाच्या भिंती तोडून टाकण्यात
खरा कोरडा ठक्क अर्थ आहे

१८ काल रात्री तू पाऊस माझ्या स्वाधीन केलास
आणि मी तुझ्या केसात रात्र माळली

१९ आता दोन्ही घरी उपाशी
त्याने जावे कुणापाशी ?
पाऊस पोरका ! अनाथ !
पाऊस अंतःस्थ बधिर
परदेसीच्या भेटीलागी व्याकुळ अधिर !

२० एक लहानखुरी सर वळवळत गेली क्षणभर
रात्रभर माझ्या मेंदूत पाऊस !
पावसाचा धिंगाणा
पहाटे संथ पागोळया टपटपत राहिल्या तुझ्या गालांवर
तू वेडी ....... माझे डोळे टिपलेस !

२१ हिरव्याशार डोळयांचं समंजस शेत
देठादेठातून फुटून उठलेले ढगांचे ओठ
पाण्यात संथ सरकत जाणारी पागोळयांची नक्षी
मनस्विनीच्या गळयात दडून बसलेले अल्लड पक्षी
जन्मजन्म झिमझिमत राहिला पावसात चिंबगार
पावसाच्या स्वप्नांना पावसाचे दार
काजळकोवळया काळिजात पावसाचे बिंब
नात्यांचे ...... पात्यांचे ...... पाऊसगर्भ टिंब !

१

पाखरे हिरवी उडाली सोडुनी धरटी नभी
गर्द जांभळ आंबराई पाय पसरोनी उभी

पाखरे हिरवी उडाली लाल चोची घेउनी
पान माना टाकलेले रक्त घेते चोखुनी

पाखरे हिरवी उडाली पंख हिरवे तोडुनी
डंख ओले मातलेले फुटत जाते पापणी

पाखरे हिरवी उडाली पाय झाले पोरके
आंधळ्या डोळा दिसेना पायवाटांचे धुके

पाखरे हिरवी उडाली सैल झाल्या ओळखी
हात झडलेल्या क्षणांची मागुती चाले सखी

२

बांध ही घालू नको तू बंधने सारी कशाला ?
हाच रस्ता सोबतीचा हुंदके आता कशाला ?

तोडले हे आतडे अन् तोडली ती नाळही
भोगल्या वेणा उपाशी त्या कळा आता कशाला ?

टेकला माथा तळाशी वाहिली ज्याला फुले
रंग जाता साकळोनी ती शिळा घ्यावी उशाला —

शब्द होते सोबतीला सोयरीला ओसरी
बेहिशेबी पापण्यांनी रक्त गाळावे कशाला ?

पाजली या ओंजळींनी जी सुखे मायावली
झेलता थुंकी तयांची तोच ओलावा घशाला—

३

अजुनी त्या वळणावर मन माझे ढळते रे ऽ
संपविते दिवस परी रोज तिथे वळते रे ऽ

क्षुद्र उरी जपलेल्या पांगविल्या नजरखुणा
सांज निळी ढळताना हाय परी पळते रे ऽ

कितिक उरा शपथविले जायचे कधी न पुन्हा
दारातिल धुंद जुई केसातुन सलते रे ऽ

संपविले स्पर्श जरी दृष्टभेट संपविली
कोमेजुन फूल, कळी परि अजून फुलते रे ऽ

सांग तूच, ढळल्यावर, कशी हसू ? हसला तू ?
अजुनी ढग पांघरुनी चंद्रबिंब कलते रे ऽ

४

जिंकलो आम्ही असे की जिंकणारे संपले
हे घराणे सोडताना पाय त्यांचे थांबले ॥

बांधली त्यांनीच दारे रंगही त्यांनी दिला
ह्या शिळेच्या काळजावर शिल्प त्यांनी कोरिले ॥

पोरके माहेर झाले वादळी झाली तनू
सागरी भरती बुडाली फक्त हाती शिंपले ॥

झाकले अदृश्य रस्ते कोंबलेल्या त्या स्मृती
घाम जेथे सांडलेला रक्त तेथे पाहिले ॥

कलकले मेंदूत गाणी हाक त्यांनी घातली
आज त्यांच्या सोबतीला फक्त अंधारी फुले ॥

५

मी उभा अव्यक्त येथे गाव माझा शोधतो
जो कधी जगलाच ना तो जीव माझा शोधतो ॥

गाइलेली सर्व गाणी आठवीतो मी पुन्हा
चिंब ओल्या पापण्यांनी सूर माझे शोधतो ॥

निखळुनी पडली अशी ही शेवटी घरटी पुन्हा
मोकळ्या उद्ध्वस्त दारी मी निवारा शोधतो ॥

जे तुझ्या मायेत वेड्या ठार विरले संपले
ते अनामिक भारलेले ऊर माझे शोधतो ॥

मी उभा एकान्तस्वामी मी कुणा ना पाहिले
बोलण्याला मी स्वतःशी शब्द माझा मागतो ॥

मरण पुढती वदना अन् गर्द ज्वाला पेटल्या
ह्या चितेच्या काळजावर जन्म माझा शोधतो ॥

६

पेटलेल्या ह्या मशाली मी पुन्हा विझवीत गेलो
वेदना ह्या अंतरीची मी पुन्हा सजवीत गेलो ॥

काजव्यांच्या पाखरांची सादही आलीच नाही
भोवती काळोख होता काय ते समजून गेलो ॥

भोगलेल्या त्या कळांची संपली अश्रूत गाणी
आतले सारे उमाळे मी पुन्हा भिजवीत गेलो ॥

संपले सारे तरीही बांधले मी विश्व माझे
आणि माझ्या प्राक्तनाला मी पुन्हा खिजवीत गेलो ॥

भोवती माझी चिता पण मी असा वेडा खुळा की
झोपलेल्या त्या शवाला मी पुन्हा निजवीत गेलो ॥

७

पाहिले ना पाहिले, इतुकेच त्यांनी पाहिले
राहिले ना राहिले, इतुकेच त्यांनी साहिले ॥

दारही नुस्तेच होते चौकटीची ना तमा
घातली ना ही कडी, इतुकेच त्यांनी पाहिले ॥

रंग हे अव्यंग की भिंतीस माती का हवी
पोचले पाणी किती, इतुकेच त्यांनी पाहिले ॥

छप्पराची फक्त छाया किरमिजी कौले कशी
काजवे येतील गा, इतुकेच त्यांनी पाहिले

राहिले तेथे घराणे, ते सुखी, म्हणती कुणी
बांधली नाही धरा, इतुकेच त्यांचे राहिले ॥

८

अशा अस्वस्थ रातीला कुणी मज धाक घालावा
निमूटाने उशा यावे गळा या चिंब ओलावा ॥

जशी आरक्त वस्त्राची झळाळी दाटुनी यावी
तसा हा आशयी चंद्र हळू ओठास लावावा ॥

अभिव्यक्तीत ओलेत्या कुणी शब्दास चुंबावे
अनोख्या पाकळीसंगे कुणी धाडील सांगावा ॥

जशा गाफील वाटांच्या कशा ह्या मोहशा वेळा
कुठे पंखावता पाने फुलांनी देठ चावावा ॥

अशा अस्वस्थ रातीला कुणी मज धाक घालावा
फकीराच्या घरापाशी असा दंगा सदा व्हावा ॥

९

पाउस येथे पडून गेला रान दूरचे भिजले राणी
पहाट ओली भुलून आली दूर काजवे विझले राणी ।।

काळोखाच्या अंधरवांनी ओठावरती केला दंश
नक्षत्रांची नवी दालने गार चांदणे रुजले राणी ।।

जांभुळओल्या जखमेवरती हाथ दाबले हिरवे पान
पानोपानी हिरवी नागिण पाय कुणाचे थिजले राणी ।।

पेंगुळलेला उदास वारा कसा मिठीने झाला चूर
इथे जाळले सागर मोती दार नभाचे सजले राणी ।।

१०

बिंधास राज्य माझे तेथून बोलतो मी
सूर्यास्त मंत्र ओठी आकाश तोलतो मी ।।

प्राचीस पाखरांना घरटे बहाल करतो
ओठास पाकळीच्या हळुवार खोलतो मी ।।

या ओंजळीत भरुनी विस्तीर्ण सागराला
बोटामधे नद्यांना घेऊन चालतो मी ।।

निर्भीड गच्च काळा अंधार पांघरोनी
वारा शरीर होता वेळूत डोलतो मी ।।

आयुष्य हे महाग कोणी हिशोब घ्यावा
रस्तेहि माणसांचे शिस्तीत कोलतो मी ।।

११

चाहूल चांदण्यांची बेहोष रात प्याली
डोळयात पाखरांची ओली सकाळ झाली ॥

तू बोलली न काही ना गाइली कहाणी
डोळयावरून खाली ती ओघळून आली ॥

जाते असे म्हणोनी तू मंद हासताना
पानावरी फुलांचे गाणे लिहून गेली ॥

देहावरी दंवाचे काटे फुलून येता
माझ्या मिठीत सारी स्वप्ने भिजून गेली ॥

तू वाट चालताना वाऱ्यास कैफ आला
आली अशी पुन्हा तू जेथे निघून गेली ॥

१२

चालणे झाले जरासे, थकत मी गेलो कसा ?
टाकले त्यांनी उसासे, वळत मी गेलो कसा ?

शब्दही इतुके न भोती नातिही नव्हती नवी
हासता कोणी कुणाला, झुकत मी गेलो कसा ?

भास ही आभासही सारे उराशी बांधले
थांबता कोणी उशाला, पळत मी गेलो कसा ?

रंग हे उधळीत गेलो जांभळया क्षितिजावरी
तांबडे आभाळ होता, विझत मी गेलो कसा ?

ना कधी कळले मला विश्वस्त मी की व्यस्त मी
कोणत्या गाफील नेत्री, ढळत मी गेलो असा !

१३

सारेच बोलणारे मी बंदिवान केले
त्या सूज्ञ भाविकांचे मी फक्त प्राण नेले ।।
चिमट्यात वास्तवाच्या पक्षीच अंध झाला
त्या शुद्ध ग्रांथिकांचे चष्मे फुटून गेले ।।
जे फक्त खात होते रात्रीत वा सकाळी
त्या मूर्ख दांभिकांचे मी ताट फस्त केले ।।
बांधून या धरेला भिंती उभारल्या मी
जे ज्या बिळात होते ते त्या बिळात मेले ।।
त्यांनी किती खुणांचा शहरी लिलाव केला
मी चिन्ह बेरजेचे तेथून फक्त नेले ।।
ह्या अंध डोळसांचे मी दीर्घ श्वास झालो
आनंदयात्रिकांना मी पायचीत केले ।।

१४

पेटल्या होळीत ज्यांनी जाळली सिंहासने
तेच झाले भक्त आता मागती आश्वासने ।।
क्रूर दैत्यांची मिजासी चिरडुनी गेले कुणी
आज ओठातून त्यांच्या कागदी संभाषणे ।।
मार्ग येता बेदिलीचा स्तंभही झाली युगे
बंद केली दांभिकांची बेगडी शीर्षासने ।।
लाळ त्यांची वीष होते, शब्दही बखरीतले
काळजीने वेढली ती साहसी नीरांजने ।।
अर्थ द्या जगण्यास सच्चा तीच क्रांतीची दिशा
रे कशाला कृष्णकृत्यांची हवी पारायणे ।।

१५

हात राखुन बोलणाऱ्या तोंड काळे
पाय चाटुन चालणाऱ्या तोंड काळे ।।

लाज ठेवावी मनाची न्याय पक्का
भाट होऊन भांडणाऱ्या तोंड काळे ।।

रक्त देणाऱ्यासही स्वातंत्र्य द्यावे
शोषणाऱ्या शेषशायी तोंड काळे ।।

पाठिराखे पोपटांचे बोल मिठ्ठू
पंख तोडुन नाचणाऱ्या तोंड काळे ।।

चौकशी होऊन द्यावी थोर शिक्षा
भाबड्यांना डांबणाऱ्या तोंड काळे ।।

शब्द वेचावे सुखाने शांतगर्भी
ओठ ओले चोरणाऱ्या तोंड काळे ।।

रे प्रकाशाची घरे बांधून व्हावे
विश्व काळे सांगणाऱ्या तोंड काळे ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९०
२२८०९
काव्य

REFBK-0022879
REFBK-0022879

१६

आज मी गाईन गाणी
जी कुणासाठी नसावी
फक्त ओल्या पाकळीने
पापणी माझी पुसावी ॥

त्या सुरांचे देठ मी
माझ्या मनाशी बांधलेले
बंध सारे तोडताना
खूण काटेरी असावी ॥

तान वाऱ्याची हवीशी
ढाळतो देहावरी मी
अत्तरे श्वासात माझ्या
त्या सुगंधाला हसावी ॥

दाद घेताना स्वतःची
पाउले ही भोवताली
स्पर्श हे रे काळजाचे
ती कशी येथे ठसावी ॥

नव्या
कविता

**विद्रोही कविता**
*संपादक : केशव मेश्राम*

नव्या
वाटा

**अपभ्रंश**
*चंद्रकान्त खोत*

**डिसेंबर आणि इतर कविता**
*अनिरुद्ध कुलकर्णी*

**आनंदवनभुवनी**
*शंकर अभ्यंकर*

**उत्थान-गुंफा ( आगामी )**
*यशवंत मनोहर*

कॉन्टिनेन्टल